खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## राज्यशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८-१९

साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाची स्थापना १५ जून २०१८ रोजी करण्यात आली. महाविद्यालयात कला शाखा अंतर्गत राज्यशास्त्र विभाग याचवेळी सुरू करण्यात आला. नव्याने सुरु झालेल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांमध्ये राज्यशास्त्र विषयाचे असणारे महत्त्व तसेच राज्यशास्त्र विषयाच्या विभिन्न संधी यामुळे कला शाखे साठी प्रथम वर्ष अंतर्गत या विषयाचा समावेश करण्यात आला. तसेच द्वितीय आणि तृतीय वर्षासाठी राज्यशास्त्र हा एक विशेष स्तरीय विषय म्हणून निवडण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यशास्त्र विभागात प्रथम वर्ष कला या वर्गात एकूण ७३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

कला शाखेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधी सोबत त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी इतर नाविन्यपूर्ण उपक्रम देखील घेण्यात आले. तसेच भारतीय संविधानातील जनजागृती करण्यासाठी संविधान गौरव दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. तसेच मतदार जनजागृती अंतर्गत उपक्रम देखील महाविद्यालया मध्ये घेण्यात आले. राज्यशास्त्र विषया अंतर्गत भारतातील प्रशासन आणि राजकारण या विषयावर सराव परीक्षा देखील घेण्यात आल्या व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले गेले.

अशा रीतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.